ePaper

# नडायचं हाय आता भिडायचं हाय, राऊत-पवारांना दिल्लीला धाडायचं हाय, मुख्यमंत्र्यांचा संदेश



| वर्ष - 6 | अंक - 63 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- आम आदमी पार्टीचा 'स्वराज्य मेळावा' मोठ्या जल्लोषात!
- कोल्हापुरातील शहीद जवान ऋषिकेश जोंधळेंच्या भगिनीचे स्वप्न सत्यात उतरले !
- यंदाची वारी निर्बंधमुक्त होईल!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 7 जून 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



आमचे मतदान भाजपला जाणार नाही. मात्र, महाविकास आघाडीला देखील शेवटच्या पाच मिनिटांत मतदान करू. संपूर्ण महाराष्ट्रात हरभरा उत्पादकांची संख्या एक लाख तर धान उत्पादकांची संख्या चार ते पाच लाख आहे. केंद्र सरकार शेतमाल खरेदी करीत नाही. त्यामुळे त्यांनी एका हेक्टरला हजार रुपये मदत हरभरा आणि धान उत्पादकांना द्यायला पाहिजे. यासंदर्भात मुख्यमंत्री आणि शरद पवार यांनी मोदींची भेट घेतली पाहिजे.

**-बच्चू कडू,** प्रहार जनशक्ती पक्ष

गोपीचंद पडळकर हे भाजपाचे आमदार आहेत. अशा लोकांना मी राजकीय विकृत औलादी म्हणेल. ते सतत शरद पवार आणि पवार कुटुंबीयांवर तोंडसुख घेत असतात. भाजपा नेते स्वत:ला सुसंस्कृत समजतात पण त्याच लोकांच्या या भावना आहेत. केवळ ते बोलू शकत नाहीत, म्हणून ते गोपीचंद पडळकर सारखा विकृत व्यक्ती पवारांच्या अंगावर सोडतात.

**- रुपाली पाटील,** राष्ट्रवादी नेत्या.



## शॉर्ट न्यूज »

### मोसमी पावसाच्या महाराष्ट्र प्रवेशाला अद्याप मुहूर्त नाहीच

**| पुणे |** गेल्या वर्षी केरळ प्रवेशानंतर अवघ्या दोनच दिवसांत महाराष्ट्रात दाखल झालेल्या नैर्ऋत्य मोसमी पावसाला यंदा प्रतिकूल वातावरणामुळे विलंब झाला आहे. मोसमी पावसाच्या महाराष्ट्रातील प्रवेशाची सर्वसाधारण तारीख ७ जून आहे. मात्र, हवामानाच्या स्थितीतून सध्या तरी या प्रवेशाबाबत मुहूर्त मिळाला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. विदर्भासह मध्य महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात उन्हाचा चटका कायम आहे.

केरळमध्ये २९ मे रोजी प्रवेश झाल्यानंतर ३१ मे रोजी मोसमी पावसाने अरबी समुद्राच्या बाजूने जोरदार प्रगती करीत कर्नाटकच्या कारवारपर्यंत धडक मारली होती. त्यावेळची समुद्रातून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्यांची स्थिती लक्षात घेता ५ जूनपर्यंत मोसमी पावसाच्या महाराष्ट्र प्रवेशाचे भाकीत हवामान विभागाकडून करण्यात आले होते.


### रक्तदान शिबीर, गरजु व्यक्तींना वस्तू वाटप, पांजरपोळ येथे अन्नदान आदी कार्यक्रम

# माजी आमदार विलास लांडे यांच्या वाढदिनी सामाजिक उपक्रम!

## माजी नगरसेवक विक्रांत लांडे, विराज लांडे यांचा पुढाकार

**| पिंपरी | | महाईन्यूज |**

**पिंपरी-चिंचवड** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार विलास लांडे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. रक्तदान शिबीर, गरजु व्यक्तींना वस्तू वाटप, पांजरपोळ येथे अन्नदान कार्यक्रम घेण्यात आला. माजी नगरसेवक व लांडे यांचे सुपुत्र विक्रांत लांडे आणि पुतणे उद्योजक विराज लांडे यांनी यासाठी पुढाकार घेतला. भोसरी विधानसभा मतदार संघात माजी आमदार लांडे यांची मोठी ताकद आहे.



आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लांडे शक्तीपदर्शन करतील, असा राजकीय जाणकारांचा अंदाज होता. मात्र, लांडे बाहेरगावी असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा पिंपरी-चिंचवड दौरा झाला. या दौऱ्यात विलास लांडे अनुपस्थित दिसले.

तळवडे- रुपीनगर प्रभागात २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ४ नगरसेवक निवडून आले होते. त्यापैकी पंकज भालेकर यांनी पुढाकार घेत लांडे यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रम घेतला. इंद्रायणीनगर प्रभागातील सामाजिक कार्यकर्ते संजय उदावंत यांनीही उपक्रम घेतला असल्याचे सांगण्यात आले.

### प्रा. कविता आल्हाट यांचा 'उत्सव दिवस'...

➡ महिला राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट यांनी माजी आमदार विलास लांडे यांचा वाढदिवस उत्सव दिवस म्हणून साजरा केला. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर आणि लांडे यांच्या वाढदिवसानिमित्त एकत्रितपणे 'खेळ रंगला पैठणीचा न्यू होम मिनिस्टर' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या निमित्ताने मोशीत वातावरण निर्मिती करण्यात आली.

### शहराध्यक्ष अजित गव्हाणे आणि शहर राष्ट्रवादीला विसर?

➡ माजी आमदार विलास लांडे शहराच्या राजकारणातील 'शरद पवार' म्हणून ओळखले जातात. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर लांडे यांच्या वाढदिवसानिमित्त शक्तीप्रदर्शन करुन भाजपासमोर आव्हान निर्माण करण्याची संधी शहर राष्ट्रवादीला होती. मात्र, ज्यांच्या बोटाला धरुन शहराध्यख अजित गव्हाणे राजकारणात आले. त्यांना विलास लांडे यांच्या वाढदिवसानिमित् एकही विधायक कार्यक्रम घेता आला नाही, याचे आर्श्चय वाटते. लांडे बाहेरगावी आहेत, अशी पुष्टी देत गव्हाणे यांनी सोशल मीडियावर शुभेच्छा देवून वाढदिवसाचे सोपस्कार केले. गव्हाणे यांनी पक्षाच्या मेळाव्याला स्वखर्चातून सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी याचे बॅनर लावले, अशी चर्चा लांडे समर्थकांमध्ये सुरू आहे.

# दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे पाटील यांच्या आठवणी चिरकाल टिकतील!

## खासदार श्रीरंग बारणे यांचे प्रतिपादन, जवाहर कोटवाणी यांना " पिंपरी चिंचवड भूषण" पुरस्कार प्रदान

**| पिंपरी -चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**पिंपरी** गावचे सरपंच ते महानगरपालिकेचे महापौर हा राजकीय प्रवास करीत असताना सामाजिक क्षेत्रात देखील आपल्या कर्तृत्वाचा वेगळा ठसा उमटवणारे दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे पाटील यांच्या आठवणी



चिरकाल टिकतील. जनमाणसात मिसळणारे, कार्याचा, कर्तृत्वाचा वेगळा ठसा असणारे वाघेरे पाटील यांचा नम्र स्वभावाचा आणि सामाजिक कार्याचा वसा त्यांची पुढची पिढी तेवढ्याच जबाबदारीने चालवित आहे असे प्रतिपादन खासदार श्रीरंग बारणे यांनी केले. दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे पाटील यांच्या ३६ व्या स्मृतिदिनानिमित्त पिंपरी कॅम्प येथील सामाजिक कार्यकर्ते जवाहर किशनचंद कोटवाणी यांना "पिंपरी चिंचवड समाजभूषण" पुरस्कार खा. बारणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सोमवारी ( दि.६ जून) पिंपरीतील नवमहाराष्ट्र विद्यालयात झालेल्या या कार्यक्रमापूर्वी माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे यांच्या हस्ते दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त पिंपरी गावातील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. तसेच नवमहाराष्ट्र विद्यालयात रक्तदान शिबिराचे आणि मोफत नेत्रचिकित्सा शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अत्याधुनिक मशीनद्वारे मोफत तपासणी करून चष्म्याचा नंबर काढून देण्यात आला. **(पान 2 वर)**

पान 1 वरुन »

## जवाहर कोटवाणी यांना " पिंपरी चिंचवड भूषण" पुरस्कार प्रदान

यावेळी आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, माजी विरोधी पक्षनेते राजू मिसाळ, नाना काटे, दत्तात्रय वाघेरे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष ॲड. नितीन लांडगे, माजी महापौर सुमनताई पवळे, संजोग वाघेरे, ज्येष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर, माजी उपमहापौर प्रभाकर वाघेरे, डब्बू आसवानी, माजी नगरसेवक रंगनाथ कुदळे, संतोष कुदळे, निकिता कदम, श्यामाताई शिंदे, उषाताई वाघेरे, माई काटे, अरुण बोऱ्हाडे, मोहम्मद भाई पानसरे, रामआधार धारिया, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष विशाल वाकडकर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब वाघेरे, यशवंत साखरे, शिवाजी वाघेरे, काळूराम साखरे, उषा मुंडे, फजल शेख, वर्षा जगताप, दत्तोबा नाणेकर, यशवंत साखरे, बाळासाहेब वाघेरे, विजय नखाते, तुकाराम कदम, अंकुश वाघेरे, बीपीन नानेकर, संदीप गव्हाणे, प्रवीण कुदळे, महेश जाचक, शिवाजी माने, नाना कांबळे आदींसह पंचक्रोशीतील ज्येष्ठ नागरिक तसेच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सहकार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

जवाहर किशनचंद कोटवानी हे पिंपरीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व व्यापारी आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना या वर्षीचा दिवंगत महापौर भिकू वाघेरे पाटील प्रतिष्ठानचा "पिंपरी चिंचवड समाजभूषण" पुरस्कार देण्यात आला. यावेळी खा. बारणे म्हणाले की, कै. भिकू वाघेरे यांच्या कार्याचा आदर्श जपणाऱ्या योग्य व्यक्तींचा सन्मान प्रतिष्ठान दरवर्षी करते हे कौतुकास्पद आहे. यावेळी महापौर ढोरे म्हणाल्या की, दिवंगत महापौर भिकू वाघेरे पाटील आणि त्यांच्या कुटुंबीयांचा शहराच्या विकासात सिंहाचा वाटा आहे. समाजातील गरजूंना उपेक्षितांना वेळोवेळी मदत करणे हा त्यांचा आदर्श संजोग वाघेरे पाटील पुढे जपत आहेत. माजी आमदार ॲड.गौतम चाबुकस्वार म्हणाले की, दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे पाटील यांनी पिंपरीतील जे. जे. ग्लास आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत शेकडो युवकांना रोजगार उपलब्ध करून दिला. पिंपरी गावातील शाळेचा पुनर्विकास व रयत शिक्षण संस्थेची वाढ वाघेरे पाटील यांच्या कार्यकाळात झाली.

प्रास्ताविक करताना संजोग वाघेरे पाटील यांनी सांगितले की, प्रतिष्ठानने यापूर्वी रुस्तम-ए-हिंद हरिश्चंद्र बिराजदार, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. डी. पाटील, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ, माजी महापौर आर. एस. कुमार, राष्ट्रीय खेळाडू गोपाळ देवांग, डॉ. रामचंद्र देखणे, राष्ट्रीय कुस्तीगीर परिषदेचे सरचिटणीस बाळासाहेब लांडगे, ज्येष्ठ कामगार नेते जे.सी. पिल्ले, शहाजी माने, कोरोना काळात अविरत सेवा करणारे डॉ. रोहन काटे, डॉ. विनायक पाटील यांचाही "पिंपरी चिंचवड समाज भूषण" पुरस्कार देऊन सन्मान केला आहे. तसेच पर्यावरणाविषयी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण या उद्देशाने उपस्थित नागरिकांना कापडी पिशव्या देण्यात आल्या आणि मावळ येथील सहारा वृद्धाश्रमास कोरडा शिधा वाटप करण्यात आला. त्याच बरोबर पुनम जाचक, हभप संदेश गोलांडे, प्रभू तीर्थनी, दिपक लोहाना आदिंचाही विशेष सन्मान करण्यात आला.

### अजितदादा, प्रशासक नेमून सत्ता चालवताहेत !

# आम आदमी पार्टीचा 'स्वराज्य मेळावा' मोठ्या जल्लोषात!

### आम आदमी पाटीचा सवाल : पिंपरी-चिंचवडकरांना सुविधा देण्यास कोणी रोखलंय?

। पिंपरी । महाईन्यूज ।



पिंपरी-चिंचवड महापालिकेत प्रशासक नेमून राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री महापालिकेत सत्ता चालवत आहेत. सामान्य पिंपरी-चिंचवडकरांना सुविधा देण्यापासून तुम्हाला कोणी रोखले आहे? असा सवाल आम आदमी पार्टीने उपस्थित केला आहे. निगडीतील पाटीदार भवन येथे आम आदमी पार्टीचा 'स्वराज्य मेळावा' मोठ्या जल्लोषात पार पडला.

यावेळी 'आप' चे महाराष्ट्र राज्य निवडणूक प्रमुख महादेव नाईक, राज्य अध्यक्ष रंगा राचुरे, राज्य संघटक व पुणे शहर कार्याध्यक्ष विजय कुंभार, राज्य सचिव धनंजय शिंदे, युवाध्यक्ष अजिंक्य शिंदे, आप वाहतूक विंग महाराष्ट्र राज्य अध्यक्ष श्रीकांत आचार्य, पुणे जिल्हा अध्यक्ष मुकुंद किर्दत, युवा उपाध्यक्ष संदीप सोनावणे, पिंपरी-चिंचवड कार्यकारी अध्यक्ष चेतन बेंद्रे, आप पिंपरी-चिंचवड प्रमुख अनुप शर्मा आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे मुख्य वक्ते रंगा राचुरे यांनी प्रस्थापित पक्षांच्या विरोधात तोफ डागत, स्थानिक तसेच राज्य पातळीवर सरकारच्या अकार्यक्षमतेची जाणीव करून दिली. मुख्य मुद्द्यांना बगल देत धार्मिक तेढ निर्माण करत सामाजिक वातावरण बिघडवून आपली अकार्यक्षमता झाकण्याचा प्रयत्न सरकारे करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

आपतर्फे केल्या जाणाऱ्या कामांची माहिती देत राज्य आणि देश पातळीवर पक्षाची होत असलेली वाढ लक्षवेधी आहे. स्थानिक पातळीवर देखील पक्षाने लोकांचे प्रश्न हाती घेत घराघरापर्यंत पोहोचावं असं कार्यकर्त्यांना आवाहन केले.

#### टक्केवारीच्या राजकारणाची परंपरा राष्ट्रवादीचीच...

2 दिवसांपूर्वी शहर दौऱ्यावर आलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी टक्केवारीच्या राजकारणावर टीका केली. मात्र, टक्केवारीच्या राजकारणाची परंपरा राष्ट्रवादी ची आणि तीच परंपरा भाजपाने पुढे सुरू ठेवली. त्यामुळे कमिशन आणि टक्केवारी साठी स्मार्ट सिटीचे प्रकल्प राबवताना कोणतेही निर्धारित मुदतीची बंधने नाहीत आणि अनेक प्रोजेक्ट प्रलंबित आहेत. त्याचे खर्च वाढविले जातात. भाजपा आणि राष्ट्रवादी दोन्ही पक्ष टक्केवारीसाठीच काम करत आहेत, असा आरोप चेतन बेंद्रे यांनी केला आहे.

#### 'नागरिकांची सनद' लोकांसमोर ठेवणार...

सर्वोपचार मोफत आरोग्य सेवा, पूर्ण दाबाने चोवीस तास शुद्ध पाणी पुरवठा, परिपूर्ण सुरक्षित रस्ते, सरकारी घरकुल योजना आणि निवारा हक्क इ मूलभूत प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी 'नागरिकांची सनद' आम्ही जनतेसमोर सादर करणार आहोत. शहरातील नागरिकांनी आम आदमी पार्टीला येत्या निवडणुकीत विजयी करावे,असे आवाहन कार्यकारी अध्यक्ष चेतन बेंद्रे यांनी निगडी येथील स्वराज्य निर्धार मेळाव्यात केले.

# कोल्हापुरातील शहीद जवान ऋषिकेश जोंधळेंच्या भगिनीचे स्वप्न सत्यात उतरले !

### कल्याणी जोंधळे हिला घर अन् शिक्षणासाठी धनादेश सुपूर्द, आमदार महेश लांडगे यांनी दिलेला शब्द पूर्ण केला

पिंपरी । महाईन्यूज ।

कोल्हापूर येथील शहीद जवान ऋषिकेश जोंधळे यांच्या बहिणीला दिलेला शब्द अखेर आमदार महेश लांडगे यांनी पूर्ण केला. वीर भगिनी कल्याणी जोंधळे हिच्या घराचे काम पूर्ण झाले. तसेच, तिच्या शिक्षणासाठीही धनादेश सुपूर्द करण्यात आला. शहीद ऋषिकेश यांच्या मातोश्री कविता जोंधळे व बहीण कल्याणी जोंधळे यांच्याकडे धनादेश सुपूर्द करण्यात आला. माजी खासदार धनंजय महाडिक यांच्या सौभाग्यवती अरुंधती महाडीक, महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील, उप महाराष्ट्र केसरी राजाराम मगदूम, कामगार नेते रोहिदास गाडे, खंडू भालेकर, देवराम जाधव,राजू बोत्रे, बाळासाहेब गाडे, अनिल लोंढे, सतिश गावडे, सागर हिंगणे, माजी सैनिक नवनाथ मु-हे, प्रमोद सस्ते आदी उपस्ति होते. कोल्हापूर जिल्ह्यातील बहिरेवाडी (ता. आजरा) येथील ऋषिकेश जोंधळे वयाच्या २० व्या वर्षी भारतीय सैन्यात भरती झाला. मात्र, अवघ्या दोन वर्षात त्यांना दि. २१ नोव्हेंबर २०२० रोजी वीरमरण आले. जोंधळे कुंटुबाचा आधार असलेला



मुलगा देशसेवेसाठी धारातीर्थी पडला. सामाजिक बांधिलकीतून आमदार लांडगे यांनी कोल्हापूरला रवाना होत शहीद जोंधळे यांची बहीण कल्याणी हिच्याकडून राखी बांधून घेतली. भाऊ-बहिणीच्या अतूट नात्याचा हा सण आमदार लांडगे यांनी कल्याणीसोबत साजरा केला. शहीद ऋषिकेश आणि त्यांच्या कुटुंबियांच्या स्वप्नातील घर उभारण्यासाठी मदत करणार आणि कल्याणी हिच्या शिक्षणासाठी व पुढील आयुष्यात कोणत्याही अडचणीत पाठिशी उभा राहण्याचा शब्द आमदार लांडगे यांनी दिला होता.

#### आमदार महेश लांडगे यांचा आदर्श...

दरम्यान, शहीद ऋषिकेश यांच्या कुटुंबियांनी घराचे काम पूर्ण केले. या घराच्या वास्तुशांतीसाठी आमदार लांडगे कोल्हापूरला रवाना झाले. शहीद ऋषिकेश यांच्या मातोश्री कविता जोंधळे यांची भेट घेतली. घरासाठी लागलेल्या खर्चाचा धनादेश कल्याणी जोंधळे हिच्या हाती सुपूर्द केला. गतवर्षी, कल्याणी हिला दुचाकी आणि लॅपटॉपही रक्षाबंधन निमित्त भेट दिली होती. शहीद जवान ऋषिकेश जोंधळे यांची बहीण कल्याणी जोंधळे ही इंटेरिअर डिझाईन शाखेची विद्यार्थीनी आहे. पुढील शिक्षणासाठीही सर्वोतोपरी मदत करणार असल्याचे आमदार महेश लांडगे यांनी म्हटले आहे. दिलेला शब्द पूर्ण करीत आमदार लांडगे यांनी आदर्श निर्माण केला आहे.

## शॉर्ट न्यूज »

### मनालीमध्ये ट्रेनिंगसाठी गेलेल्या साताऱ्यातल्या बसचा भीषण अपघात

।मुंबई।महाईन्यूज।

मनाली येथे प्रशिक्षणासाठी गेलेल्या साताऱ्यातील बसचा अपघात झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे.
देशाच्या अनेक भागांत मागील काही दिवसांपासून सतत अपघातांच्या मालिका घडत आहेत. या अपघातांमध्ये अनेकांना आपला जीव गमवावा लागला. तर काही जण गंभीर जखमी झाले आहे. नुकताच उत्तराखंडच्या उत्तरकाशी परिसरात चारधाम यात्रेला जाणारी बस दरीत कोसळण्याची घटना घडली. ही घटना ताजी असतनाचा मनाली येथे प्रशिक्षणासाठी गेलेल्या साताऱ्यातील बसचा अपघात झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, सातारा जिल्हा परिषदेच्यामार्फत अटल बिहारी वाजपेयी इन्स्टिट्यूटयांच्या ट्रेनिंग साठी साताऱ्यातून शिवेंद्रराजे रेस्क्यू टीम आणि महाबळेश्वर ट्रेकर्स मधून ५० जण या ट्रेनिंगसाठी पाठवण्यात आले होते. रेस्क्यू ऑपरेशनच्या ट्रेनिंगसाठी हे प्रशिक्षार्थी गेले होते. चार आठवड्यांचे ट्रेनिंग संपल्यानंतर

### मास्कचा वापर अद्याप सक्तीचा केलेला नाही, दंडही आकारण्यात येणार नाही

# यंदाची वारी निर्बंधमुक्त होईल!

## आरोग्यमंत्री राजेश टोपे यांची माहिती

।मुंबई।महाईन्यूज।
प्रतिनिधी।

राज्यातील सहा जिल्ह्यांमध्ये कोरोनाचे रुग्ण वाढत आहेत. आता तर जुलै महिन्यात आषाढी एकादशी आहे. वारीमध्ये १० ते १५ लाख वारकरी सहभागी होतात. कोरोनाचे संकट असले तरी काळजी घेऊन दिंडी पूर्ण करावी असा तत्वतः निर्णय झाला आहे. त्यामुळे यंदाची वारी होईल त्यात कोणतीही अडचण येणार नाही, असे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी सोमवारी स्पष्ट केले ( राज्यातील वाढत्या कोरोना रुग्णसंख्येवर मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाली.
यावेळी कोविड सादरीकरणही झाले. या बैठकीनंतर राजेश टोपे यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना वरील माहिती दिली.



### नेत्यांना कोरोनाची लागण

जुलै महिन्यातील आषाढी एकादशीच्या वारीबद्दल माहिती देताना टोपे म्हणाले की, आता वारीची तयारी पुढे गेली आहे. वारीमध्ये लाखो वारकरी एकत्र येतात. त्यामुळे काळजी घेऊन वारी पूर्ण करावी लागेल अशी चर्चा मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाली. यंदाची वारी होईल त्यात कोणतीही अडचण येणार नाही. चित्रपट निर्माता- दिग्दर्शक करण जोहरच्या पार्टीत सहभागी झालेले अनेक सेलेब्रिटी कोरोना पॉझिटिव्ह झाले आहेत. या पार्टीत सहभागी झालेल्यांना कोरोनाच्या बीए ४ आणि बीए ५ या व्हेरीयंटचा संसर्ग झाला. राजकीय क्षेत्रातील नेतेही कोरोना पॉझिटिव्ह होत आहेत. विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांना कोरोनाची लागण झाली. सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनाही ताप येत आहे. त्यांच्या चाचणीचा अहवाल अद्याप आलेला नाही, असे टोपे म्हणाले.

### तीन ते आठ टक्के पॉझिटिव्ही दर

राज्यात मुंबई शहर, उपनगर, ठाणे, पालघर, रायगड आणि पुणे या सहा जिल्ह्यात कोरोना रुग्णांची संख्या वाढत आहे. या जिल्ह्यात तीन ते आठ टक्के पॉझिटिव्ही दर आहे. चाचण्यांमध्ये रुग्ण पॉझिटिव्ह आढळत असले तरी रुग्णालयात दाखल होणा-या रुग्णांचे प्रमाण चार टक्के आहे. यामध्ये गंभीर रुग्णांची संख्या नाही. त्यामुळे काळजीचे कारण नाही. पण या सहा जिल्ह्यात कोरोना चाचण्या कठोरपणे वाढवण्याच्या सूचना केंद्र सरकारनेही दिल्या आहेत, असे टोपे यांनी सांगितले.

### बूस्टर डोसचे आवाहन

मास्कचा वापर अद्याप सक्तीचा केलेला नाही. दंडही आकारण्यात येणार नाही. पण सर्वांना मास्क वापरण्याचे आवाहन आम्ही केले आहे, अशी माहिती टोपे यांनी दिली. लसीचे दोन डोस घेतलेल्यांनी बूस्टर डोस घ्यावा. दुसरा डोस घेतल्यावर नऊ महिने झाले असतील तर त्यांनी बूस्टर डोस घ्यावा. स्वतःची आणि समाजाची काळजी घेण्यासाठी बूस्टर डोस घ्यावा, असे आवाहन राजेश टोपे यांनी केले.

---

## अयोध्या दौरा हा धार्मिक कार्यक्रम, राजकीय शक्तिप्रदर्शन नाही, संजय राऊतांचं विधान

।मुंबई।महाईन्यूज।

अयोध्या दौरा हा आमचा धार्मिक कार्यक्रम आहे, राजकीय शक्तिप्रदर्शन करण्याचा कोणताही इरादा नाही, असं शिवसेनेचे खासदार संजय राऊत म्हणालेत. संजय राऊत हे उत्तर प्रदेश दौऱ्यावर असून, त्यांनी अयोध्येत जाऊन रामलल्लांचं दर्शनही घेतलंय. त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतलीय, त्यावेळी ते बोलत होते.
आम्ही काल मुंबईतून इथे आलो आहोत, प्रभू श्रीरामाचं दर्शनही झालं. आणि आता तुमचं दर्शन करत आहे. 15 तारखेला आमच्या शिवसेनेचे नेते, महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री आदित्य ठाकरेजी त्यांचा एक दिवसाचा अयोध्येत दौरा आहे.



शिवसेनेनं नेहमीच अयोध्येच्या बाबतीत आस्था ठेवली आहे. जेव्हापासून आंदोलन सुरू झालंय, तेव्हापासून आणि नंतरही उद्धव ठाकरे दोन वेळा इकडे येऊन गेले, असंही संजय राऊत म्हणालेत.
मुख्यमंत्री नव्हते तेव्हासुद्धा आले, आणि मुख्यमंत्री बनल्यानंतर एका आस्थेनं रामलल्लाचं दर्शन करून गेले. आमच्या सगळ्यांची एक भावना आहे. अयोध्येत येण्यानं आम्हाला एक ऊर्जा मिळते. एक पॉझिटिव्ह एनर्जी मिळते. शिंदेसाहेबही सांगत होते, इथे आल्यानंतर मोठी ऊर्जा मिळते आणि ही ऊर्जा घेऊन आम्ही महाराष्ट्रात जातो.

आम्ही काल मुंबईतून इथे आलो आहोत, प्रभू श्रीरामाचं दर्शनही झालं. आणि आता तुमचं दर्शन करत आहे. 15 तारखेला आमच्या शिवसेनेचे नेते, महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री आदित्य ठाकरेजी त्यांचा एक दिवसाचा अयोध्येत दौरा आहे. शिवसेनेनं नेहमीच अयोध्येच्या बाबतीत आस्था ठेवली आहे. जेव्हापासून आंदोलन सुरू झालंय, तेव्हापासून आणि नंतरही उद्धव ठाकरे दोन वेळा इकडे येऊन गेले, असंही संजय राऊत म्हणालेत.

## अनिल देशमुख, नवाब मलिक यांना राज्यसभेसाठी मतदान करता येणार?

### बुधवारी होणार निर्णय, राज्यसभेसाठी येत्या 10 जून रोजी निवडणूक

।मुंबई।महाईन्यूज।
प्रतिनिधी।

कुख्यात गुंड दाऊद इब्राहिमशी संबंधित मालमत्ता खरेदी केल्याच्या आरोपावरून अटकेत असलेले मंत्री नवाब मलिक आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख ( यांना राज्यसभा निवडणुकीत मतदान करता येणार किंवा कसे, याचा निर्णय बुधवारी (८ जून) होणार आहे. राज्यसभेसाठी येत्या १० जून रोजी निवडणूक होत आहे. एकूण 6 जागांसाठी 7 उमेदवार रिंगणात आहेत. सहाव्या जागेसाठी शिवसेनेचे संजय पवार आणि भाजपचे धनंजय महाडिक यांच्यात लढत होणार आहे. महाविकास आघाडीसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची आहे. शिवसेना आणि भाजपची मदार अपक्ष आमदार आणि लहान पक्षांच्या आमदारांवर आहे. या निवडणूकीत प्रत्येक मत महत्त्वाचे आहे. या निवडणुकीत मतदान करता यावे म्हणून नवाब मलिक आणि अनिल देशमुख यांनी न्यायालयात अर्ज दाखल केले होते. हे दोघे राष्ट्रवादीचे आमदार असून त्यांना राज्यसभा निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावायचा आहे.





सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) केलेल्या आरोपांमुळे मलिक आणि देशमुख सध्या आर्थर रोड कारागृहात आहेत. या दोन्ही नेत्यांनी न्यायालयात अर्ज करून राज्यसभेच्या निवडणुकीत मतदानासाठी परवानगी मागितली आहे. या अर्जावर उत्तर देण्यासाठी ईडीने वेळ मागितला आहे. या दोन्ही अर्जांवर बुधवारपर्यंत उत्तर देण्याचे निर्देश न्यायालयाने ईडीला दिले आहेत. येत्या ८ जूनला यावर सुनावणी आहे.

## शॉर्ट न्यूज »

### पाकिस्तानी बोटीतून २५० कोटींचे हेरॉइन जप्त; एटीएसची धडक कारवाई

**नवी दिल्ली**
**महाईन्यूज । प्रतिनिधी।**

गेल्या काही दिवसांपासून गुजरातमध्ये एटीएसकडून अंमली पदार्थांविरोधात कारवाई करण्यात येत आहे. पुन्हा एकदा एटीएस (ATS) ने गुजरातमधील कच्छमधून एका पाकिस्तानी बोटीतून मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ जप्त केले आहे. बीएसएफ (BSF) च्या मदतीने एटीएसने ही कारवाई केली आहे. गेल्या काही दिवसांपूर्वीच मुंब्रा बंदरातून ५०० किलोचे कोकेन (cocaine) जप्त करण्यात आले होते. त्यानंतर आता तब्बल २५० कोटी रुपयांचे ५० किलो हेरॉईन (heroin) जप्त करण्यात आले आहे. पाकिस्तानी बोटीतून हा हेरॉईनचा साठा भारतात आणला जात असल्याची माहिती एटीएसला मिळाली होती. त्यानंतर एटीएसने बीएसएफच्या मदतीने ही कारवाई केली आहे.

### भारतातील 65 टक्क्यांहून अधिक लोकसंख्या कार्यरत वयाची

# भारतासाठी मोठी लोकसंख्या वरदान की ओझे?

## भारताच्या आर्थिक दृष्टिकोनातून कार्यरत लोकसंख्येमुळे काळ खूप चांगला

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

केंद्रीय मंत्र्यांनी लोकसंख्या नियंत्रण कायद्याचा उल्लेख केल्याने आता भारताची मोठी लोकसंख्या हे वरदान आहे की ओझे अशा चर्चांना उधाण आले आहे. दरम्यान देशाच्या लोकसंख्येच्या आर्थिक पैलूंवर विचार केला जातोय. या मुद्याच्या निष्कर्षापर्यंत पोहचण्यापूर्वी आपण समजून घेतले पाहिजे की, भारतातील 65 टक्क्यांहून अधिक लोकसंख्या कार्यरत वयाची आहे. ही लोकसंख्या 15 ते 59 वर्षांपर्यंत आले. यातील 27 -28 टक्के लोक 15 ते 29 वयोगटातील आहेत. कार्यरत लोकसंख्येच्या टक्केवारीत वाढ झाल्याने इतरांवर अवलंबून 14 वर्षाखालील आणि 60 वर्षांपेक्षा जास्त वयोगटातील लोकसंख्येची टक्केवारी कमी होत आहे. भारतात आज अशी परिस्थितीत आहे की कार्यरत लोकसंख्या खूप जास्त आहे आणि अवलंबून असलेली लोकसंख्या खूपच कमी आहे. त्यामुळे भारताच्या आर्थिक दृष्टिकोनातून हा काळ खूप चांगला आहे.



देशात काम करणाऱ्या किंवा रोजगाराच्या शोधात असलेल्या लोकांची संख्या जास्त राहणे आवश्यक आहे. याला LFPR म्हणतात. महामारीच्या काळात अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. यातील अनेकांनी हताश होऊन नोकरी शोधणे सोडून दिले. ही काही चांगली परिस्थिती नाही. एलएफपीआर उच्च असला पाहिजे, त्यासोबतच देशात चांगल्या नोकऱ्यांची उपलब्धता राखली जाणे आवश्यक

### भारतासाठी कार्यरत लोकसंख्येचा फायदा घेण्याची हीच आहे वेळ

**युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंडच्या एका अभ्यासानुसार, भारताकडे 2005-06 ते 2055-56 या कालावधीत इतर कोणत्याही देशापेक्षा जास्त कार्यरत लोकसंख्येचा लाभ घेण्याचा अवधी असणार आहे. राज्यांच्या वेगवेगळ्या लोकसंख्येमुळे हे थोडेसे बदलू शकते. पण लोकसंख्येच्या फायद्यांची गणना करताना, आपण हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की, कार्यरत लोकसंख्येचा स्वतःहून फायदा होऊ शकत नाही. त्यासाठी श्रमिक बाजाराचे विश्लेषण करून धोरणांवर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. या लोकसंख्येचा फायदा घेण्यासाठी सरकारला शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात खर्च वाढवावा लागेल.**

### कॅनडातील परिस्थिती भारतापेक्षा अगदी उलट...

भारतातील लोकसंख्येच्या विविधतेचा उपयोग अनेक प्रकारे आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी केला जाऊ शकतो. इतकेच नाही तर तरुण लोकसंख्येच्या बळावर भारत जगासाठी प्रतिभेचा कारखाना बनला आहे. कारण भारतात मोठ्याप्रमाणात शिक्षक ते सीईओ आणि सॉफ्टवेअर इंजिनिअर तयार होत आहेत. तर दुसरीकडे कुशल कामगारांची संख्याही जास्त आहे. मात्र कॅनडासारख्या देशातील परिस्थिती भारताच्या अगदी उलट आहे. एकीकडे वाढत्या वयामुळे लोकांना दीर्घायुष्य लाभले आहे, तर दुसरीकडे कमी जन्मदरामुळे लोकसंख्या अतिशय मंद गतीने वाढत आहे. त्यामुळे लोकसंख्येतील वृद्धांची टक्केवारी वाढली आहे. कालांतराने कॅनडाला कार्यरत लोकसंख्येच्या कमतरतेचा सामना करावा लागेल आणि याचा थेट परिणाम आर्थिक वाढीच्या दरावर होईल.

---

## नरेंद्र मोदींच्या हस्ते खास नाण्यांचे प्रकाशन

### अंध व्यक्तीलाही समजणार नेमके किती रुपये

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज एक, दोन पाच, दहा आणि वीस रुपयांच्या नाण्यांची खास मालिका जारी केली आहे. ही नाणी सामान्य नाण्यांपेक्षा विशेष असतील असणार आहेत. कारण ही नाणी किती रुपयांची आहेत हे अंध व्यक्तींनादेखील ओळखता येणार आहेत. दिल्ली येथील अर्थ मंत्रालय आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयातर्फे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या कार्यक्रमांतर्गत आयकॉनिक विक या साप्ताहिक कार्यक्रमाचे यायोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मोदी यांनी वरील खास नाणी सार्वजनिक केली. मोदी यांच्या हस्ते जारी करण्यात आलेल्या या विशेष नाण्यांची काही




खास वैशिष्ट्ये आहेत. या नाण्यांवर 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवा'चा (AKAM) लोगो असेल. तसेच ही नाणी अंध व्यक्तींना लगेच ओळखता येतील. कोणता शिक्का किती रुपयांचा आहे हे अंध व्यक्तींना सहज समजू शकेल. नरेंद्र मोदी यांनी अर्थ मंत्रालय आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या आयकॉनिक विक या कार्यक्रमाचे उद्घाटन करताना उपस्थितांना संबोधित केले. यावेळी त्यांनी भारत सरकारने युवकांच्या प्रगतीसाठी काय काय

## "भाजपाला आखाती देशांकडे माफी मागावी लागत आहे"

### *नुपूर शर्मांविरील कारवाईनंतर संजय राऊतांची प्रतिक्रिया*

**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।**

प्रेषित मोहम्मद यांच्या बद्दल भाजपाच्या दोन पदाधिकाऱ्यांनी अवमानकारक टिप्पणी केल्याप्रकरणी अरब देशांमध्ये निषेधाचा सूर उमटला आहे. त्यामुळे या दोन्ही पदाधिकाऱ्यांवर रविवारी भाजपाला कारवाई करावी लागली. एका वृत्तवाहिनीवर ज्ञानवापी प्रकरणावरील वादचर्चेत भाजपाच्या राष्ट्रीय प्रवक्त्या नुपूर शर्मा यांनी प्रेषित मोहम्मद यांच्याबद्दल वादग्रस्त विधान केल्याचा आरोप आहे. दिल्ली भाजपाचे माध्यम प्रमुख नवीन कुमार जिंदाल यांनीही प्रेषितांबद्दल अवमानकारक टिप्पणी केल्याचा आरोप असून, पक्षाने त्यांची हकालपट्टी केली. शर्मा यांना



पक्षाने निलंबित केले आहे. याबाबत बोलताना शिवसेना नेते संजय राऊत यांनी भाजपाला आखाती देशांकडे माफी मागावी लागत आहे असे म्हटले आहे. संजय राऊत हे अयोध्येत पत्रकार परिषदेत बोलत होते. "हे प्रकरण आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले आहे. अनेक आखाती देशांनी भारतीय राजदूतांना बोलवून नाराजी व्यक्त केली आहे. भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी प्रेषित मोहम्मद यांच्याबद्दल जे वक्तव्य केले आहे त्याचे समर्थन या देशात कोणीही करणार नाही. भाजपाला या प्रकरणी देशासह संपूर्ण आखाती देशांकडे माफी मागावी लागत आहे," असे संजय राऊत म्हणाले. यावेळी बोलताना संजय राऊत यांनी काश्मीरमधील परिस्थितीबाबतही भाष्य केले. "दहशतवादी भरदिवसा काश्मिरी पंडितांची हत्या करत आहोत ही छोटी घटना आहे का? भाजपा त्यांच्या नेत्यांच्या वक्तव्यांशी सहमत आहे का हे सांगून टाकावे.

काश्मिरी पंडितांची मदत करु असे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. हे कोणी भाजपाच्या नेत्याने म्हटले असते तर आम्हाला आनंद झाला असता. पण काश्मिरच्या बाबतीत फक्त राजकारण करणे त्यांच्या रक्तात आहे. तीन महिन्यात २७ काश्मिरी पंडितांची हत्या झाली आहे. तर १७ मुस्लिम पोलीस अधिकाऱ्यांची हत्या झाली आहे.

## बॉलिवूडकरांना करण जोहरची पार्टी पडली महागात


# कतरिनानंतर आता शाहरुखलाही कोरोनाची लागण

अभिनेत्री कतरिना कैफ कोरोना पॉझिटीव्ह) निघाल्यानंतर आता अभिनेता शाहरुख खान यालाही कोरोनाची लागण झाली आहे. शाहरुखसुद्धा करण जोहरच्या पार्टीत सहभागी होता.

निर्माता-दिग्दर्शक करण जोहर याच्या वाढदिवसाची पार्टी कोरोनासाठी हॉटस्पॉट ठरला आहे. अभिनेत्री कतरिना कै कोरोना पॉझिटीव्ह निघाल्यानंतर आता अभिनेता शाहरुख खान यालाही कोरोनाची लागण झाली आहे. शाहरुखसुद्धा करण जोहरच्या पार्टीत सहभागी होता.

२५ मे रोजी यशराज स्टुडिओमध्ये) करण जोहरने आपल्या ५० व्या वाढदिवसाची पार्टी दिली होती. या पार्टीला अनेक बॉलिवूड सेलिब्रिटी हजर होते. मात्र, ही पार्टी आता कोरोना हॉटस्पॉट ठरली आहे. कारण मीडिया रिपोर्ट्सनुसार या पार्टीतील जवळपास ५० ते ५५ लोकांना कोरोनाची बाधा झाली आहे. यामध्ये प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्री कतरिना कैफ आणि अभिनेता शाहरुख खान याचाही समावेश आहे.

फिल्मफेअने (FILMFARE) त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून शाहरुख खानला कोरोना झाल्याची माहिती पोस्ट केली आहे. 'शाहरुख खान कोरोना पॉझिटिव्ह. आम्ही अभिनेत्याला लवकरात लवकर बरे वाटावे अशी इच्छा व्यक्त करतो.' अशी पोस्ट फिल्मफेअरने केली आहे.



शाहरुख खानही करण जोहरच्या पार्टीला उपस्थित होता. तो रेड कार्पेटर (RED CARPET) दिसला नाही. मात्र, डान्स फ्लोअरवर कोई मिल गया गाण्यावर नाचताना तो दिसला.

दरम्यान अभिनेता कार्तिक आर्यन ४ जून रोजी कोरोना पॉझिटीव्ह आढळळा. मात्र, तो करण जोहरच्या बर्थडे पार्टीला उपस्थित नव्हता. त्याला कोरोनाची लागण झाल्याने त्याचा आयफा २०२२ मधील परफॉर्मन्सही मिस झाला. यानंतर शनिवारी आदित्य रॉय कपूर देखील कोरोना पॉझिटीव्ह आढळल्याची माहिती समोर आली. एका पाठोपाठ एक कलाकार कोरोना पॉझिटीव्ह आढळल्याने बॉलिवूडकरांवर कोरोनाचं सावट पसरलं आहे. .

# सई ताम्हणकरने पटकावला IIFA 2022 मध्ये सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीचा पुरस्कार

मराठी सिनेसृष्टीतील बोल्ड ॲण्ड ब्यूटीफुल अभिनेत्री म्हणून सई ताम्हणकरला ओळखले जाते. सईने मराठी टेलिव्हिजनपासून ते मोठमोठ्या चित्रपटांपर्यंत आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. सई ताम्हणकरला मराठीसिनेसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी ओळखले जाते. मात्र सोशल मीडियावरील नवनवीन पोस्टमुळे नेहमीच चर्चेत असणारी सई आता पुन्हा एकदा चर्चेचा विषय बनली आहे. याचे कारण म्हणजे अभिनेत्री सई ताम्हणकरला इंटरनॅशनल इंडियन फिल्म अकॅडमी म्हणजेच आयफा (IIFA) या पुरस्कार सोहळ्यात सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीचा पुरस्कार पटकावलेला आहे. सईला 'मिमी' या हिंदी चित्रपटातील तिच्या भूमिकेसाठी पुरस्कार प्राप्त झाला आहे.

यावर्षीचा IIFA 2022 पुरस्कार सोहळा दुबईतील अबूधाबी येथे आयोजित करण्यात आला होता. या पुरस्कार सोहळ्याला बॉलिवूडमधील अनेक दिग्गजांनी हजेरी लावली होती. यामध्ये सलमान खान, शाहरूख खान, विकी कौशल, कृती सेनन, ऐश्वर्या बच्चन, अनन्या पांडे, सई ताम्हणकर यांसारख्या अनेक दिग्गज कलाकारांनी हजेरी लावली होती. शनिवारी रात्री या पुरस्काराची घोषणा करण्यात आली. या दरम्यान, सई ताम्हणकरला 'मिमी' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीचा पुरस्कार घोषित करण्यात आला.



'मिमी' चित्रपटाला इतरही अनेक पुरस्कार मिळाले आहेत. 'मिमी' चित्रपटामध्ये एका सरोगेट आईची गोष्ट दाखवण्यात आली आहे. ही मुख्य भूमिका अभिनेत्री कृति सेनन ने साकारली आहे. सई ताम्हणकरने चित्रपटात कृतिच्या जवळच्या मैत्रिणीची भूमिका साकारली आहे.



# 'जेजीएम' चित्रपटातून पहिल्यांदाच विजय देवरकोंडा आणि पूजा हेगडे दिसणार एकत्र

टॉलिवूडचा सुपरस्टार विजय देवरकोंडा सध्या एका मागे एक नवनवीन चित्रपट घेऊन येत आहे. नुकताच त्याने त्याच्या लाइगर चित्रपटाचे चित्रीकरण अभिनेत्री समंथा प्रभूसोबत पूर्ण केले असून विजयने आता 'जेजीएम' चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरूवात केली आहे. या चित्रपटात विजय देवरकोंडा एका आर्मी ऑफिसच्या भूमिकेत दिसणार असून मागील काही दिवसांपूर्वी निर्मात्यांकडून चित्रपटाची घोषणा करण्यात आली होती. मात्र त्यावेळी विजय देवरकोंडा सोबत कोणती अभिनेत्री असणार याचा खुलासा झाला नव्हता. मात्र आता 'जेजीएम'मधील मुख्य अभिनेत्रेच नाव समोर आले आहे.





'जेजीएम' चित्रपटात ही अभिनेत्री मुख्य भूमिकेत चित्रपटाच्या निर्मात्यांनी एक शेअर करत अभिनेत्री पूजा हेगडेचे स्वागत केले आहे. नुकतेच या चित्रपटाते शूटिंग सुरू झाले असून अभिनेत्री पूजा हेगडेने संबंधित फोटो तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर शेअर केले आहेत.

'जेजीएम' चित्रपटातून पहिल्यांदाच पूजा हेगडे आणि विजय देवरकोंडा एकत्र 'जेजीएम' चित्रपटातून पहिल्यांदाच पूजा हेगडे आणि विजय देवरकोंडा ही जोडी पहिल्यांदा एकत्र काम करणार आहेत.

# 'हीरामंडी' वेब सीरिजसाठी संजय लीला भन्साळींनी घेतलं कोट्यवधींचं मानधन

'गंगूबाई काठियावाडी' या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केल्यानंतर आता दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांचे देखील भाव वधारले आहेत. गंगूबाई काठियावाडी नंतर आता भन्साळी यांनी 'हीरामंडी' या वेब सीरिजची घोषणा केलीये. सध्या हीरामंडी वेब सीरिज बजेट, स्टार कास्ट आणि वेब सीरिजमध्ये कलाकारांनी घेतलेल्या मानधनामुळे चर्चेत आली आहे. गेल्या वर्षी ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सने याची घोषणा केली होती. वेब सीरिजच्या दिग्दर्शनासाठी संजय लीला भन्साळी यांनी कोट्यवधी रुपयांचे मानधन आकारले आहे.




हीरामंडी तयार करण्यासाठी नेटफ्लिक्स तब्बल 200 कोटी रुपये खर्च करणार आहे. सिरीजमध्ये अनेक मोठ्या दिग्गज कलाकारांची वर्णी लागली आहे.

बॉलिवूड हंगामाच्या रिपोर्टनुसार, वेब सीरिजच्या कास्टींग ,प्रोडक्शन आणि कलाकारांसाठी 200 कोटी खर्च होणार आहे. यासह 60 ते 65 कोटी रुपये भन्साळी यांनी वेब सीरिजच्या दिग्दर्शनासाठी रक्कम आकारली आहे.

हीरामंडीमध्ये 'या' कलाकारांची वर्णी

वेब सीरिजमध्ये सोनाक्षी सिन्हा, मनीषा कोइराला, हुमा कुरैशी, रिचा चड्डा झळकणार आहे. दरम्यान अजूनही अनेक स्टार काम करणार असून सध्या त्यांची नावे गुलदसत्यात आहेत. माहितीनुसार माधुरी दिक्षित वेब सीरिजमध्ये मुख्य अभिनय करताना दिसणार आहे. यासह हीरामंडीमध्ये काम करण्यासाठी मुमताज यांना देखील अप्रोच करण्यात आलं होतं. मात्र त्यांनी ही ऑफर नाकारली. मात्र याबद्दल अधिकृतपणे भाष्य करण्यात आलं नाहीये.

हीरामंडी हा संजय लीला भन्साळी यांचा अत्याधिक जवळचा प्रोजेक्ट असून ही वेब सीरिज एकूण सात भागात चित्रित करण्यात येणार आहे. सीरिजमध्ये भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीची कथा दाखवण्यात येणार आहे.

## शॉर्ट न्यूज »

### विश्वनाथन आनंदने पुन्हा दिली मॅग्नसला मात



। नवी दिल्ली । महाईन्यूज

विश्वनाथन आनंदचे आता एकूण १० गुण झाले आहेत. विजेतेपद मिळवण्यासाठी त्याला उर्वरित चार फेऱ्यांमध्ये सातत्यपूर्ण खेळ दाखवावा लागेल.

दिग्गज भारतीय खेळाडू विश्वनाथन आनंदने नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेतील क्लासिकल प्रकारातील पाचव्या फेरीत विजय मिळवला. आनंदने जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या मॅग्नस कार्लसनचा पराभव केला. या विजयासह आनंदने गुणतालिकेत अव्वल स्थान गाठले आहे. क्लासिकल प्रकारात आनंदने आर्मगिडॉन (सडन डेथ बॅटल) सामन्यात पुन्हा मॅग्नसला मात दिली. नियमित ४० चालींचा खेळ झाल्यानंतर लढत अनिर्णित राहिल्यामुळे आर्मगिडॉनची मदत घ्यावी लागली.विश्वनाथन आनंदचे आता एकूण १० गुण झाले आहेत. विजेतेपद मिळवण्यासाठी त्याला उर्वरित चार फेऱ्यांमध्ये सातत्यपूर्ण

## आयपीएलचा हंगामा सुरू

# येत्या काळात एकाच वर्षात दोन वेळा आयपीएल?

## ‘या’ खेळाडूने दिला खास प्लॅन

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

दरवर्षी आयपीएलच्यापूर्वी क्रिकेटप्रेमींमध्ये आयपीएल आणि संघाची चर्चा रंगते. आयपीएलचा हंगामा सुरू होण्यापूर्वी चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असते. अशातच क्रिकेट प्रेमींच्या आनंदात आता आणखी वाढ होणार आहे.

दरवर्षी आयपीएलच्यापूर्वी) क्रिकेटप्रेमींमध्ये आयपीएल आणि संघाची चर्चा रंगते. आयपीएलचा हंगामा सुरू होण्यापूर्वी चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असते. अशातच क्रिकेट प्रेमींच्या आनंदात आता आणखी वाढ होणार आहे. कारण येत्या काळात एकाच वर्षात दोनवेळा आयपीएलचे आयोजन करता येईल, असा अंदाज भारताचा माजी क्रिकेटपटू आकाश चोप्रा याने वर्तवला आहे.

आकाश चोप्राने त्याच्या यूट्यूब चॅनलवर बोलत असताना त्याने आयपीएलबाबत भविष्यवाणी केली



आहे. शिवाय “गेल्या काही काळात आयपीएलमध्ये बरेच बदल झाले आहेत. त्यावरून असे दिसून येते की आयपीएल आणखी पुढे गेली आहे. हे अचानक घडणार नाही ५ वर्षे लागू शकतात, परंतु मला वाटते की ते नक्कीच होईल”, असे त्याने म्हटले.

दरम्यान, वर्षभरात दोन आयपीएल खेळवण्याचा विचार केल्यास वर्षभरात कसे आयोजन करायचे याचेही उत्तर आकाश चोप्राने दिले.

**आयपीएल ही जगातील सर्वात मोठी क्रिकेट लीग असून या आयपीएलबाबत अनेक दिग्गज खेळाडू चर्चा करत असतात. अनेक माजी खेळाडू हे सोशल मीडियाच्या माध्यमातून चर्चा करत आपला अंदाज वर्तवत असतात. तसेच काही बदल व्हावे यासाठी मत व्यक्त करत असतात. याच खेळाडूंमध्ये आता भारताचा माजी क्रिकेटपटू आकाश चोप्रानेही महत्वपूर्ण मत व्यक्त केले आहे. आकाश चोप्राने लवकरच वर्षातून दोन आयपीएल पाहायला मिळतील, असा विश्वास व्यक्त केला आहे आणि ते निश्चित आहे.**

“आता आयपीएलमध्ये १० संघ आहेत, त्यामुळे सामन्यांची संख्या आपोआप वाढेल. आयपीएल मोठ्या फॉरमॅटमध्ये असेल ज्यामध्ये ९४ सामने असू शकतात, तर आयपीएल लहान असेल जिथे संघ एकमेकांविरुद्ध फक्त एकच सामना खेळत असतील, हे छोटे आयपीएल एका महिन्यात संपू शकते.”, असे त्याने सांगितले.



# उपांत्य फेरीत जागा मिळवण्यासाठी आठ संघामध्ये लढत सुरू

## रणजी करंडकातील उपांत्यपूर्व फेरीचे सामने आजपासून सुरु

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेट स्पर्धा आणि करोना महामारीमुळे खंडीत झालेल्या रणजी करंडकातील उपांत्यपूर्व फेरीचे सामने आजपासून सुरू झाले आहेत. उपांत्य फेरी गाठण्यासाठी आठ संघ आपापसात भिडले आहेत. चारही सामने ६ जून ते १० जून या कालाधीत बेंगळुरूमध्ये खेळवले जात आहेत. पण, येत्या चार

### बंगाल विरुद्ध झारखंड

बाद फेरीसाठी पात्र ठरण्यासाठी एलिट ग्रुप बी मधील तीनही सामने जिंकणारा बंगाल हा एकमेव संघ आहे. पहिल्यांद उपांत्यपूर्व फेरीत पोहचलेल्या झारखंडसोबत त्यांची लढत सुरू आहे. झारखंडने नाणेफेक जिंकून बंगालला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले आहे.

### मुंबई विरुद्ध उत्तराखंड

४१ वेळच्या विजेत्या मुंबईपुढे उत्तराखंडचे आव्हान आहे. या सामन्यात पृथ्वी शॉ मुंबईचे नेतृत्व करत आहे. मुंबई विरुद्ध उत्तराखंड सामना ओल्या आउटफिल्डमुळे उशिरा सुरू झाला. मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतलेला आहे.

### कर्नाटक विरुद्ध उत्तर प्रदेश

कर्नाटकसमोर उत्तर प्रदेशचे तगडे आव्हान आहे. उत्तर प्रदेशच्या संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला आहे. रात्री उशिरा झालेल्या पावसामुळे आऊटफिल्ड ओले झाल्याने नाणेफेकीला उशीर झाला. देवदत्त पडिक्कल, करुण नायर, मनीष पांडे आणि मयंक अग्रवाल हे भारतीय संघात खेळलेले खेळाडू कर्नाटकच्या संघात आहेत. त्यांना आयपीएलमधील तारांकित खेळाडू असलेले मोहसीन खान आणि यश दयाल यांच्या गोलंदाजीचा सामना करावा लागत आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही